# राष्ट्रीय आरोग्य अभियान,

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद सातारा अंतर्गत

## विविध पदांसाठी अर्ज करणेत आलेल्या उमेदवारांसाठी सुचना

विविध पदांसाठी ज्या उमेदवारांनी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदांसाठी अर्ज केलेला आहे. त्या उमेदवारांची तात्पुरती पात्र/अपात्र यादी जिल्हा परिषद सातारा या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेली होती. व ऑनलाईन पध्दतीने दि. ११ मार्च २०२२ ते १८ मार्च २०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वा. पर्यंत उमेदवारांची कागदपत्रे व त्यांचे म्हणणे सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. त्यानंतर राबविणेत आलेल्या छाननी प्रक्रियेनुसार पुनश्च: सुधारित पात्र/अपात्र यादी प्रसिध्द करणेत येत आहे. त्यानुसार त्यातील अपात्र उमेदवारांनी दिलेल्या शेऱ्याप्रमाणे आपआपली कागदपत्रे विहित मुदतीत (दि.०४/ ०४/२०२२ ते दि.०५/ ०४ /२०२२) या कार्यालयास कोविड वॉर रुम, जिल्हा परिषद सातारा येथे सकाळी ९.४५ ते सांयकाळी ६.१५ पर्यंत समक्ष सादर करावीत. उमेदवार त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, उच्च शैक्षणिक अर्हता किंवा छाननी मध्ये दिल्या गेलेल्या गुणाबाबत हरकती घेवून आपले म्हणणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना मांडु शकतात.

## सुचना

१. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या कागदपत्राची तपासणी करुन मगच सुधारित पात्र/अपात्र यादी वेबसाईट वर उपलब्ध करुन देणेत येत आहे. **ही यादी केवळ सुधारीत पात्र/अपात्र यादी आहे. गुणवत्ता यादी नाही.** पात्र उमेदवारांना केवळ पात्र असलेमुळे नियुक्ती मिळेलच असे नाही.

२. उमेदवारांने व्यक्तीशः उपस्थित राहुन दि.०४ /०४ /२०२२ ते दि.०५ / ०४ /२०२२ या मुदतीत कोविड वॉर रुम, जिल्हा परिषद सातारा येथे सकाळी ९.४५ ते सांयकाळी ६.१५ पर्यंत लेखी अर्जादवारे समक्ष सादर करावीत.

३. ई-मेल व्दवारे किंवा इतर कोणत्याही पध्दतीने किंवा माध्यमाव्दारे हरकती अथवा कागदपत्रे सादर करणेत येवू नयेत. उमेदवारांने स्वत: उपस्थित राहुन कागदपत्रे सादर करावीत.

४. उमेदवारांना भरती प्रक्रियेमध्ये कागदपत्रे सादर करणेसाठी ही शेवटची संधी आहे.यानंतर कागदपत्रे सादर करणेसाठी अथवा उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, उच्च शैक्षणिक अर्हता किंवा छाननी मध्ये दिल्या गेलेल्या गुणाबाबत हरकती घेता येणार नाहीत. यानंतर प्राथमिक गुणवत्ता यादी तयार करणेत येईल. तसेच C.G.P.A/ Grade सिस्टीम मुळे ज्यांच्या गुणांमध्ये तफावत आहे किंवा ज्यांचे अंतिम वर्षाचे टक्केवारी काढता येत नाही अशा उमेदवारांनाही कागदपत्रे सादर करुन आपले म्हणणे मांडावे.

५. इतर उमेदवाराबाबत सुध्दा विहित मुदतीत हरकती /आक्षेप घेता येतील.

६. सदर भरती प्रक्रिया मुलाखतीव्दारे घेतली जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७. विहित मुदतीत आक्षेप/ कागदपत्रे सादरिकरण न केलेस भविष्यात होणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रकारासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच छाननी प्रक्रियेमध्ये गुणांमध्ये (अंतिम वर्षाचे गुण, अनुभवांचे गुण व उच्च शैक्षणिक अर्हतेचे गुण) वेळोवेळी अदययावत करणेत आलेले आहेत. त्यामुळे प्रथम छाननी प्रक्रियेचे गुण व सुधारित छाननी प्रक्रियेचे गुण याच्यात तफावत आढळु शकते.

८. भरती प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने प्राप्त कागदपत्राच्या आधारे करणेत आलेली असलेने उमेदवारांस प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणीच्या वेळी तफावत आढळलेस प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर उमेदवारांस अपात्र करणेत येईल.

९. उमेदवारांने राखीव प्रवर्गातुन अर्ज केला असलेस जातीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

**<u>राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषगाने राबविणेची प्रक्रिया</u>**

उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक(Qualifying Exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणाच्या टक्केवारीचे ६० प्रमाणे प्रॅप्रोशन काढावे.(उदा. ६० टक्के गुण प्राप्त असल्यास त्याचे ६० प्रमाणे Propotion =६०*६०/१००=३६) | ६० गुण |
| पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम १० गुण दयावेत. (उदा. स्टाफ नर्स पदासाठी B.sc Nur. उमेदवाराने अर्ज केला असल्यास त्यास १० गुण दयावेत. औषध निर्माण अधिकारी पदासाठी B.pharm असल्यास १० गुण देणेत येतील. | १० गुण |
| शासकीय व निमशासकीय अनुभव असल्यास (किमान अनुभव ०६ महिने) | प्रत्येक १ वर्षासाठी ४ गुण दयावेत. (६ महिन्यांसाठी ०२ गुण) फक्त शासकीय संस्था विभाग शासन अंगीकृत संस्था यांचाच अनुभव ग्राहय धरणेत येईल. | ३० गुण |

प्र. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,
जिल्हा परिषद सातारा

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

| सातारा जिल्हा परिषद सातारा | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय आरोग्य अभियान Ayush PG Medical Officer (Unani) कंत्राटी भरती पात्र/अपात्र उमेदवार सुधारीत यादी (एकुण पृष्ठ क्रं १) | | | | | | | | | | Compliances Submitted as per Remark | | | | | | |
| # | Application No. | Candidate Name | Category | Qualification | MD(Unani) | Experience In Year | Experience In Month | Provisinally Qualify/ Provisinally Disqualify | First Scrutiny Remark | Compliances Submitted as per Remark Yes/N0 | 60 % Proportion against Final year Marks | Marks as per Experience (Max.30) | 10 Marks for Higher Qualification | Total | Provisinally Qualify/ Provisinally Disqualify | 2nd Scrutiny Remark |
| 1 | NHM214759 | SHUBHANGI ASHOK YADAV | Against Reservation | 1)Allied Course (If Any)(BAMS) | 59.06 | 0 | 6 | Provisinally Disqualify | Candidate dosent fulfill educational criteria | NO | 0 | 0 | 0 | 0 | Provisinally Disqualify | Candidate dosent fulfill educational criteria |

टिप- पात्रता यादी उमेदवारांनी भरलेल्या ऑनलाईन माहितीच्या आधारे तयार करणेत आलेली आहे. प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणीचे वेळी भरलेली माहिती कागदपत्रांमधील माहिती यामध्ये कसल्याही प्रकारची विसंगती आाढळुन आलेस कुठल्याही स्तरावर अर्जदारांचा अर्ज अपात्र ठरविणेत येईल.